(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जाक्र.मजीप्रा-१०९९/इतिवृत्त-८८/आ-४.

दिनांक : २८ सप्टेंबर २०००.

विषय : **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या, सोमवार दिनांक २५ सप्टेंबर २००० रोजीं झालेल्या ८८ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

सोमवार, दिनांक २५ सप्टेंबर २००० रोजीं, झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८८ व्या बैठकीचे प्रारुप इतिवृत्त सोबत सादर करण्यांत येत आहे, त्यास मंजुरी मिळावी, ही विनंती.

सोबत : प्रारुप इतिवृत्त.

28/9

**(सुरेश साळवी)**
**सदस्य सचिव**

**मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.**

15/10

Date 16/10

MS(A)

20/10

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ८८ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ८८ वी सभा मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष मा.ना.श्री.आर.आर.पाटील यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५.९.२००० रोजी संपन्न झाली. या बैठकीस प्राधिकरणाचे खालील सदस्य व विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.आर.आर.पाटील, मा.मंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
२. ॲडव्होकेट सुलेखा कुंभारे, मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व.तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्राल्य, मुंबई.
३. श्रीमती चित्कला झुत्शी, प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. श्री.व्ही.पी.राजा, सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. श्री.सुरेश साळवी, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त खालील विशेष निमंत्रित उपस्थित होते.

१. श्री.राजेंद्र सगणे, सदस्य सचिव (तांत्रिक), म.जी.प्रा., मुंबई.
२. श्री.सुधीर ठाकरे, उप सचिव, पा.पु. व स्व.विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. श्री.स.रा.बागल, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
४. श्री.मिलिंद केळकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
५. श्री.बी.टी.कांबळे, अधीक्षक अभियंता (गुण परिक्षण पथक), म.जी.प्रा., मुंबई.
६. श्री.जी.सी.शर्मा, अधीक्षक अभियंता (म.नि.सं. व सं.कक्ष), म.जी.प्रा., नवी मुंबई.
७. श्री.र.शे.कामत, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
८. उप सचिव श्रीमती मोंडकर, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.(सचिव, ग्रा.वि. वि. यांचे प्रतिनिधी)
१०. उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.(सचिव, सा.आ.वि. यांचे प्रतिनिधी)

श्री.विनय बन्सल, प्रधान सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग यांनी गैरहजेरीची परवानगी घेतली होती, ती मान्य करण्यांत आली.

मा.मंत्री, ग्राम विकास, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे परवानगीने सभा सुरु झाली.

### (१) कार्यक्रम बाब क्र.१ : (आयत्यावेळची कार्यक्रम बाब)

सचिव, पा.पु. व स्व.विभाग यांनी ग्रामीण पाणी पुरवठा हा विषय जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित करण्यासंदर्भातील प्रस्तावांबाबत सादरीकरण केले. सदर सादरीकरणामध्ये शासकीय आस्थापनेवरील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाखालील जिल्हापरिषदेअंतर्गत कार्यरत असलेले विभाग, उप विभाग तसेच कर्मचारी वर्ग यांची माहिती आणि सदर आस्थापनेवरील सध्याचा कार्यभार याची माहिती विषद केली. सादरीकरणामध्ये भारताच्या संविधानाअंतर्गत, जिल्हापरिषदेकडे राज्यस्तरीय विषय हस्तांतरणासंदर्भात विविध तरतुदींच्या माहितीची नोंद घेण्यांत आली. सदर विषयातील पाणी पुरवठा व स्वच्छता हे दोन विषय जिल्हापरिषदेकडे

हस्तांतरीत करण्यासंदर्भात मंत्रीमंडळास प्रस्ताव सादर करण्यांत येत असून सदर प्रस्तावातील ठळक वैशिष्ट्ये सादरीकरणामध्ये नमूद करण्यात आली. त्यावरील प्राधिकरणाचे अभिप्राय, बैठकीत देण्यांत यावेत असे सचिव, पा.पु. व स्व. विभाग यांनी प्रतिपादीत केले. विषय तातडीचा व महत्वाचा असल्यामुळे यावर प्राधान्याने बैठकीत सविस्तर चर्चा करण्यांत आली.

म.जी.प्रा.चा मागील १० वर्षातील सरासरी अंदाजित वार्षिक भांडवली खर्च रु. ६०० कोटी इतका असून, या खर्चापैकी ग्रामीण पाणी पुरवठा योजनेवरील खर्च सुमारे रु. ४०० कोटी व रु. २०० कोटी इतका खर्च नागरी पाणी पुरवठा योजनेवर होत असल्याची नोंद सभासदांनी घेतली. ग्रामीण पाणी पुरवठा योजनेवरील संबंधीत जिल्ह्यातील भांडवली खर्चाचा विचार करुन आवश्यक तितके विभाग जिल्हापरिषदेस उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित करण्यात येत असल्याचे नमूद करण्यात आले. तसे करतांना प्रत्येक जिल्ह्याकरिता किमान एक विभाग उपलब्ध करुन देण्यांत येईल अशीही नोंद घेण्यांत आली. वरीलप्रमाणे सादरीकरणानंतर व सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(अ) रु. ७५ लक्ष खर्चाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना चालू योजनांसह जिल्हापरिषदेकडे वर्ग करण्याची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळास सादर करण्यांत यावा.

(ब) म.जी.प्रा.कडे जितका कार्यभार कमी होईल त्याप्रमाणात म.जी.प्रा.अंतर्गत विभाग, उप विभाग जिल्हापरिषदेस उपलब्ध करुन देण्यांत यावेत.

(क) फक्त एका गावाची स्वतंत्र पाणी पुरवठा योजना जिल्हापरिषदेने राबवावी (रु. ७५ लाखापेक्षा कमी भांडवली खर्चाची).

(ड) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना तसेच रु. ७५ लाखापेक्षा जास्त भांडवली खर्चाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना सध्याच्या प्रचलित पध्दतीनुसार म.जी.प्रा.ने राबवाव्यात.

वरीलप्रमाणे चर्चा झाल्यानंतर उपस्थितांचे आभार मानण्यांत आले व कार्यसूचीतील इतर कार्यक्रम बाबीवरील चर्चा पुढील बैठकीत करण्याचे ठरवून बैठक संपविण्यांत आली. पुढील बैठकीची तारीख सत्वर देण्याचेही ठरले.